International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.5 No.2 Nov – Dec 2017

# मजल दरमजल - एक आकलन

**डॉ. बाळासाहेब खोमणे**
*एल्फिन्स्टन महाविद्यालय, मुंबई.*

रामचंद्र भिकाजी जोशी यांचा जन्म हैद्राबाद येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण अमरावती, महाविद्यालयीन शिक्षण इंदूर येथे झाले. एम्.ए.त्यांनी मुंबईतून पूर्ण केले. माध्यमिक शाळेत, शिक्षक, काही वर्षे दिल्ली आकाशवाणीवर वृत्तनिवेदक, सिद्धार्थ कॉलेज, मुंबई येथे इंग्रजीचे प्राध्यापक व महाड येथील महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून त्यांनी काम केले. 'काचेचे कवच' व 'झम्मन' हे त्यांचे कथासंग्रह; 'वाताहत' ही कादंबरी; 'मजल दरमजल','वाटचाल','घाट शिळेवरी उभी' ही त्यांची इतर पुस्तके प्रसिद्ध आहेत.

प्रवासात जे प्रत्यक्ष पाहिले, अनुभवले ते लेखनरूपाने मांडणे म्हणजे प्रवासवर्णन, असे स्थूलमानाने म्हणता येईल. हे वर्णन हकीकत किंवा वृत्तांतकथन असते. देश, काल, परिस्थिती यांचे वर्णन, प्रवासातील अनुभव वस्तुनिष्ठपणे सांगणे, असेच त्याचे स्वरूप असते. इंग्रजी वाङ्मयाच्या प्रभावाने हा वाङ्मयप्रकार मराठीत आला.

सुरुवातीचे मराठीतले असे लेखन परिचयपर, गोषवारा सांगणारे असे होते. महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकरांचे कोलम्बसचा वृत्तांत, गोविंद नारायण माडगावकरांचे मुंबईचे वर्णन व नारायण विष्णू जोशी यांचे पुणे शहराचे वर्णन ही प्रवासवर्णने परिचयात्मक होती. शामराव मोरोजी यांनीं इ. स. १८५२ त अनेक ग्रंथ, यात्रेकरू व देशाटन करणारे लोक यांच्या सहाय्याने 'काशिप्रकाश म्हणजे महायात्रावर्णन' हे पुस्तक लिहिले. मराठी भाषेतील हे पहिलेच प्रवासवर्णन होय.[१] जगन्नाथ विठोबा क्षत्री यांनी 'गोकर्ण महाबलेश्वराचा यात्रेप्रकरणीं वृत्तान्त,' प्रश्नोत्तररूपाने प्रसिद्ध केला. गोडसे भटजीचे माझा प्रवास हे मात्र खरे प्रवासवर्णन ठरले.[२] तथापि काणेकरांच्या धुक्यातून लाल ताऱ्याकडे या प्रवासवर्णनाने मराठी प्रवासवर्णनांना वाङ्मयीन गुणवत्ता प्राप्त करून दिली. प्रवासवर्णनाचे आणखी नवे रूप गंगाधर गाडगीळ गोपुरांच्या प्रदेशात, आणि साता समुद्रापलीकडे, पु. ल. देशपांडेंची अपूर्वाई, पूर्वरंग ही प्रवासवर्णने वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

मजल दरमजल हे रामचंद्र भिकाजी जोशी यांचे अतिशय गाजलेले प्रवासवर्णन आहे. 'ब्रह्म्याची नगरी' या लेखात पैठणचे वर्णन लेखकाने केल आहे. ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केल्यावर आपल्याला राहण्यासाठी कोणते ठिकाण निवडावे हा विचार त्यांच्या मनात आला. त्यांनी गोदावरी नदीच्या उत्तर तीरावरील पैठण/प्रतिष्ठानची निवड केली. आजही या पैठणमध्ये एक खांब आहे. या खांबाच्या टोकाला पुराचे पाणी लागले की, सृष्टी नष्ट होणार अशी समजूत आहे. पुनः ब्रह्मदेव सृष्टी निर्माण करणार, असी आख्यायिका आहे. असे हे पैठण विद्येचे

आगार, धर्माचे न्यायपीठ, कथा- काव्याचे अधिष्ठान, शालिवाहन राजाचे, हाल राजाचे राज्य, आणि व्यापाराचे ठिकाण म्हणून खूप प्रसिद्ध होते. चक्रधर स्वामी यांनाच या ठिकाणी शिक्षा दिली गेली होती. ज्ञानेश्वर आणि भावंडांना याच ठिकाणी शुद्धिपत्रक आणण्यास जावे लागले होते. पैठण हे संत एकनाथांचे पैठण म्हणून ओळखले जाते. या नगरीचे वर्णन चक्रधर शिष्या बोणेबाई पुढील प्रकारे करतात, ' मुनिदेव हे थोर नगर: एथ तुम्ही चुकल:'[३] असे हे वैभवशाली नगर आज वैभवशाली इतिहास दाखवत भग्नावस्थेत पोहचले आहे.

दुर्गराज देवगिरी या लेखात देवगिरीच्या किल्ल्याचे वर्णन आले आहे. या किल्ल्याचे कडे तासून काढलेले आहेत. चाळीस हात लांब आणि पन्नास हात खोल असे खंदक या किल्ल्याभोवती आहेत. सैनिक लपण्यासाठी मोठमोठी भुयारे या किल्ल्यात आहेत. शत्रू आला की संपलाच असा हा अद्भुत किल्ला अतिशय दुर्गम आणि अभेद्य आहे. याच पर्वतरांगांमध्ये वेरुळच्या सुंदर लेण्या आहेत, घृष्णेश्वर मंदिर आहे.

ते ऋद्धिपूर देखिले या लेखात ऋद्धिपूरचे वर्णन आले आहे. ऋद्धिपूर म्हणजे गोविंदप्रभूंचे निवासस्थान होते. ऋद्धिपूरच्या रस्त्यावर खारी (खारुताई) कवडे, साळुंक्या आणि वानरे मोठ्या प्रमाणत दिसली. त्यांचे वैशिष्ट्ये म्हणजे ते सर्व मातकट (माती) कलरची होती. लेखक ऋद्धिपूरच्या महाद्वारात पोहचले. महाद्वार हे मंदिराच्या गाभाऱ्यासारखे होते. हेच गोविंदप्रभूंचे निवासस्थान. येथील बरेचशे बांधकाम पडले असून अनेक झाडे येथे उगवली आहेत. जवळच खोलेश्वर मंदिर आणि विहीर आहे. याच विहिरीवर बसून म्हाइंभट्ट जेवण करीत असे. आज या ठिकाणी पडलेल्या भिंतीचे ढिगारे आहेत.

एकदा गोविंद्प्रभुन्ना स्वतःच्या विवाह समारंभ व्हावा असे वाटले. म्हणून या ठिकाणी महदाइसा यांनी धवळे गाईले. (धवळे म्हणजे लग्नप्रसंगी म्हणावयाचे गीत) म्हणून महदाइसा यांना आद्य कवियित्री असे म्हणतात. मराठीतील स्त्री-गीतांचा पाया घातला तो इथेच.[४] याच ठिकाणी गोविंदप्रभू आणि चक्रधर यांची पहिली भेट झाली होती. हरपालदेव यास चक्रधर म्हणून गोविंद्प्रभू यांनी याच ठिकाणी हाक मारली होती. आजही अनेक उध्वस्त वास्तू येथे आहेत.

अळजपूर निके नगर या लेखात विदर्भातील एलिचपूरचे वर्णन आले आहे. चाळीस वर्षापूर्वी लेखक एलिचपूरला आले होते तेंव्हाचे ते वर्णन करतात. त्यांचे शिक्षण याच गावात झाले होते.

याच गावात दुलारहमानशाह यांचा दर्गा आहे. तो रहमानशाह गाझी झाल्यावर हिंदू आणि मुस्लीम दर्ग्यात जाऊ लागले. या दर्ग्याला अल्लाउद्दीन खिलजी याने मदत केली होती. या दर्ग्याचा मकबरा नागपूरकर भोसले यांनी बांधून दिला होता. दुलारहमानशाह हे गझनीच्या मह्मदाकडून इल राजाबरोबर लढाई करण्यासठी आले होते. दोघांची लढाई झाली आणि त्यात दोघेही मरण पावले.

एलिचपूरमधील सर्वात मोठी इमारत म्हणजे तेथील देवडी होय. आज ही वैभवशाली देवडीचे वैभव नष्ट झाले आहे. या गावचे वर्णन महानुभाव संप्रदायातील रामदेव दारणे पुढीलप्रमाणे करतात, ' जी: जी: अळजपूर निके नगर असे:'[५]

आम्ही असतो याची ग्रामी या लेखात गाणगापूर (कर्नाटक)चे वर्णन लेखक करतात. लेखक गाणगापूरला गेल्यावर त्यांची गाडी बस थांब्यावर पोहोचताच काही उपाध्याय पूजा विचारण्यासाठी त्यांच्याकडे येतात. ती पूजा पाच रुपयांपासून पंच्याहत्तर रुपयांपर्यंत असते. लेखक फक्त दर्शन आणि प्रसाद घेतात. मठाच्या आवारात आरती नैवद्य झाल्यावर जहांगीर नावाचा गाईड त्यांना भेटतो. त्याची दोन लग्न झालेली आहेत. तो मुसलमान असूनही माधुकरी मागून जेवतो. याचे लेखकाला आश्चर्य वाटते. भीमा आणि अमरजा या नद्यांचा संगम हे नृसिंह सरस्वती यांचे आवडीचे ठिकाण होते.

प्रभूचा कट्टा या लेखात माणिकनगर येथील माणिक प्रभू यांच्या स्थळाविषयी वर्णन आले आहे. हे ठिकाण हैद्राबाद – सोलापूर महामार्गावर आहे. माणिकप्रभू यांनी वयाची पंचवीस वर्ष फकिरी जीवनात काढली. जंगल डोंगरांमध्ये तपश्चर्या केली.

वैराज्यक्षेत्रमं उत्तमम या लेखात वाई या गावाचे वर्णन आले आहे. पंडित भाऊशास्त्री लेले यांनी याच ठिकाणी संस्कृत विषयाचे अध्ययन व्हावे यासाठी प्राज्ञ पाठशाळेची स्थापना केली होती. महाबळेश्वरला पाऊस पडायला सुरुवात झाली की, येथील कृष्णा नदी दुथडी भरून वाहते. पाच नद्यांसाठी या गावात पाच प्राणलिका बांधल्या आहेत. (या नद्या भारतातील मोठ्या नद्या असून त्यांचे पाणी येथे येते अशी भावना आहे.) या गावात विष्णू आणि लक्ष्मी यांची सुंदर मंदिरे आहेत. या गावात नदीवर अनेक घाट असून एका घाटावर गणपतीचे खूप सुंदर मंदिर आहे. अफजलखान ज्या वेळी स्वराज्यावर चालून आला होता त्याचा शेवटचा मुक्काम याच वाई गावात होता. येथील अध्यात्मिक आणि सांस्कृतिक वातावरण चागले असल्याने शंकराचार्य यांनी वाईला वैराज्यक्षेत्रमं उत्तमम असे म्हटले आहे.

श्रीमूळपीठ आणि हेन्री मूर या लेखात औंध संस्थानातील श्रीमूळपीठ या ठिकाणचे वर्णन आले आहे. या गावात एक वस्तुसंग्रहालय असून त्याचे ठिकाण श्रीमूळपीठ हे आहे. एका ऊंच डोंगरावर हे ठिकाण असून साडेचारशे पायऱ्या चढून वर जावे लागते. औंध संस्थानचे राजे हे फार कलाप्रेमी होते. चढणीचा मार्ग आल्हादायक वाटावा म्हणून अतिशय सुशोभित केला आहे. वाघ, सिंह, हत्ती यांचे शिल्प येथे तयार करण्यात आली आहेत. औंध संस्थानातील राजे प्रजादक्ष होते. त्यांनी अनेक कलांना उत्तेजन दिले होते. येथील संग्रहालयात येथील राजांनी जगातील सर्वश्रेष्ठ कलाकारांच्या अनेक कलाकृती या संग्रहालयात ठेवल्या होत्या.

मजल दरमजल हा प्रदीर्घ शीर्षक लेख आहे. या लेखात लेखक, बापू आणि अण्णासाहेब या तिघांनी केलेल्या इंदूर – मुंबई - पुणे या सायकल प्रवासाचे वर्णन आले आहे. एके दिवशी सायकलने मुंबईला जाण्याचा विचार करतात. दररोज ७०-७५ मैल प्रवासाचे ते नियोजन करतात. महू – मानपूर - गुजरी असा त्यांचा प्रवास झाला. नर्मदा नदी ओलांडून खळघाट या गावी ते पोहचले खळघाटवरून सेंधवा हे गाव ४०- ४५ मैल होते. विंध्य पर्वतातील हे एक ऊंच ठिकाण होते. सेंधवा हे होळकर संस्थानातील शेवटचे गाव. शिरपूरला एका गुजराथी व्यक्तीने त्याच्या जिनिंग मिलमध्ये त्यांच्या राहण्याची सोय केली.

शिरपूर थाळनेर पाहिले. धुळे या गावी ते पोहचले. धुळे आणि ऑस्ट्रेलिया शहरांची त्यांनी साम्य सांगितले. शिवाय विद्यार्थ्यांनी असा प्रवास केल्यावर विचार कसे मोठे होतात हे सांगितले. त्यांचा निरोप घेऊन त्यांनी मालेगावच्या दिशेने प्रयाण केले. मालेगावमध्ये त्यांनी एका भटजीकडे मुक्काम केला. चांदवडला होळकरांचा फार मोठा वाडा होता. इंदोरवरून आलेले पाहुणे म्हणून शिवाय ते होळकर कॉलेजचे विद्यार्थी म्हणून त्यांचा उचित सत्कार केला गेला. त्यांना पुरणपोळीचे जेवण देण्यात आले. चांदवड हे गाव यादववंशाची राजधानी होती. त्याचे जुने नाव चान्द्रदीत्यपूर असे होते. चांदवडी रुपया येथीलच. कारण येथे जुनी टाकसाळ होती. चांदवड जवळच्या डोंगराला साडेतीन रोडग्यांचा डोंगर म्हणतात. चांदवड सोडल्यावर ते नाशिक येथे पोहचले. इगतपुरीत त्यांनी स्वतः जेवण तयार केले. इगतपुरीतून ते ठाणे येथे पोहचले. ठाणे-घाटकोपर- कुर्ला असा त्यांनी प्रवास केला. ते दादरला डोंगरे बागेजवळच्या एका चाळीत मुक्कामाला आले. दुसऱ्या दिवशी त्यांनी टाऊन हॉल, फाउंटन, प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, अपोलो बंदर, राजाबाई टॉवर, हायकोर्ट, गिरगाव, परळ, लालबाग आदी ठिकाणे पहिली. त्यांनी या ठिकाणी पहिल्यांदा लाईट वर चालणारी रेल्वे पहिली. संध्याकाळी खोपोली येथे एका नातेवाईकाकडे त्यांनी मुक्काम केला. नंतर खंडाळ्याचा घाट चालून लोणावळा, कार्ला लेणी पाहून पुण्यात प्रवेश केला. पुण्यात आल्यावर छत्रपती शिवाजी महाराज त्यांचे पराक्रम, शाहिस्तेखानाची बोटे तोडलेली जागा, माधवराव पेशवे पडले ते ठिकाण त्यांनी पहिले. टिळक आगरकर, चिपळूणकर यांच्या कार्याची त्यांना आठवण झाली. शनिवारवाडा, लाल महाल, नूतन मराठी विद्यालय, हरिभाऊ आपटे यांचा आनंदाश्रम, गायकवाडांचा वाडा, नवा पूल, पर्वती टेकडी, सिंहगड, फर्गुसन कॉलेज अशा अनेक गोष्टी त्यांनी दोन दिवस सायकलने फिरून पहिल्या. इंदूर ते पुणे असा त्यांचा पाचशे मैलाचा प्रवास झाला होता.

दिल्ली अजून दिल्लीच आहे या लेखात दिल्लीचे वर्णन आले आहे. अनेक वर्षापूर्वी पाहिलेली दिल्ली आणि सध्या दिल्लीत झालेला बदल लेखकाने चित्रित केला आहे. दिल्लीत खूप बदल झाले आज दिल्लीचे स्वरूप कॉस्मॉपॉलिटनझाले असले, दिल्ली बदललेली असली तरी गाभा मात्र तसाच आहे असे ते म्हणतात.

फिर्दौस बरूए जमीं हा लेख लाल किल्याचे वर्णन करणारा आहे. फिर्दौस बरूए जमीं हे शब्द लाल किल्ल्यातील दिवाने खास वर लिहिलेले आहेत. बादशहांचे दरबार, तेथील पाण्याची व्यवस्था, किल्ल्याच्या आतील भव्यता, सौंदर्य आदी गोष्टी त्यांनी सांगितल्या आहेत. दिवाने खास, दिवाने आम याची कार्यपद्धती ते सांगतात. परंतु आज हे सर्व उजाड झाल्याचे ते स्पष्ट करतात. हे वर्णन वाचतांना त्यांचे भाषिक संस्कार दिसून येतात. संस्कृत, उर्दू व इंग्रजी या तिन्ही भाषांचे संस्कार ' त्यांच्या लेखनावर झाले. 'या तिन्ही भाषांच्या उत्तम संस्कारांतून एक विशिष्ट तोल जोशी यांच्या शैलीला, जीवनविषयक दृष्टीला आणि व्यक्तित्वालाही लाभला आहे,' असे मत प्रा. रमेश तेंडुलकरांनी व्यक्त केले आहे.[६]

मथुरा देवनिर्मिता या लेखात लेखकाने मथुरेचे वर्णन केले आहे. मथुरा ही कंसाची राजधानी असली तरी कृष्णाचा जन्म मथुरेत झाला. त्याच्या रासलीला वृंदावनात झाल्या. त्याने पराक्रमाने कंसाला मारले. त्यामुळे

मथुरानिवास करणारे श्रीकृष्णावर खूप प्रेम करतात. महाभारत युद्धातील राजकारण आणि उपदेश हे सर्व या जनपदात घडले. कृष्ण मथुरेत वेगवेगळया नावांनी ओळखला जातो. मथुरेतील वृंदावन, गीतामंदिर, गोविंददेव मंदिर, तेथील गोशाळा, धर्मशाळा यांचे वर्णन लेखकाने केले आहे.मथुरेत देवळांची गर्दी आजच आणि अडीच हजार वर्षापूर्वी येथे मंदिरे होती. हिंदू, जैन आणि बौद्ध मंदिरांचे चवथ्या शतकापासूनचे अवशेष येथे पाहायला मिळतात. टॉलेमीने मथुरेस देवतांचे नगर असे म्हटले आहे. तर हयुएनत्सागंने (चीनीप्रवासी)येथे किती तरी बौद्ध विहार पाहिल्याचे तो नोंदवितो.

आयोध्यापुरी देखितां या लेखात आयोध्येचे वर्णन आले आहे. इक्ष्वाकूच्या वंशातल्या राजांची ही राजधानी. प्रभू श्रीराम यांचे हे जन्म ठिकाण. सूर्यवंशी राजांनी तिचे वैभव वाढविले. पुत्रप्राप्ती साठी राजा दशरथाने श्रृंगऋषीला येथे बोलावले होते. पुत्रकामेष्टी यज्ञ केला ते हे ठिकाण. राम लक्ष्मण आदी राजपुत्रांना शिक्षण देण्यासाठी विश्वमित्र याच ठिकाणी आले होते. राम वनवास, राजा दशरथ यांचा पुत्रवियोगाने मृत्यू, राम रावण युद्ध आदी सर्व गोष्टींची आयोध्या ही साक्षीदार आहे. आयोध्या रामभक्तांची पुण्यभूमी आहे येथे रामाची अनेक मंदिरे आहेत शिवाय हनुमान गढी हे मंदिर येथेच आहे. कैकयी महल, सुमित्रा महल, कौसल्या महल, सीता की रसोई ही स्थानेही येथे आहेत.

बिठूर हे ब्रह्मावर्त म्हणून ओळखले जाते. ब्रह्मेश्वर मंदिर येथे आहे. अश्वमेघ यज्ञ केल्यावर ब्रह्मदेवाने घोड्याच्या पायाचा चांदीचा नाल येथेच ठेवला आहे. लेखक ज्या वेळी बिठूरला जातात त्या वेळी दक्षिणी ब्राह्मण कोठे मिळेल हे पाहतात. त्यानंतर ते गंगाप्रसाद या गाईड बरोबर बिठूर पाहायला जातात. औरंगजेबाने बांधलेली मशीद, लक्ष्मणाने सीतेला आणून सोडलेली जागा पाहिल्यावर सीतेच्या मनात काय विचार आले असतील याचाही ते विचार करतात. नानासाहेब पेशव्यांचा वाडा गोऱ्या सैनिकांनी लुटल्याचे तो गाईड सांगतो. भलत्या वेळी मिळालेले तनख्याचे आठ लक्ष रुपये दुसऱ्या बाजीरावाने गंगा नदीत टाकल्याचे ठिकाणही गाईड दाखवितो. आजही अनेकांना त्यातील काही पैसे सापडतात हे सांगतो. तात्या टोपेंचा वाडा आज बऱ्या अवस्थेत आहे. कानपूर वरून सैन्य पाठीमागे लागल्यावर अनेक मौल्यवान वस्तू नानासाहेब पेशव्यांनी गंगेत टाकल्याचे गंगाप्रसाद सांगतो.

विठो पालवीत आहे या लेखात पंढरपुरचे वर्णन आले आहे. त्यात सकाळी होणारी काकडारती, देवस्नान, भोळे भक्त यांचे वर्णन यात येते. कऱ्हाडनगरी कृष्णातीरी या लेखात कऱ्हाड गावचा सांकृतिक, आध्यात्मिक इतिहास ते स्पष्ट करतात. एकूणच 'त्यांच्या प्रवासवर्णनात गैरवाजवी तपशील नाही, आणि उगाच आणलेली भावुकताही नाही. असे तळवलकरांनी नमूद करून म्हटले आहे, 'मराठीतील वैशिष्ट्यपूर्ण प्रवासवर्णनांत जोशी यांच्या प्रवासवर्णनांचा समावेश होतो.[७]

वैराज्यक्षेत्रमं उत्तमम, अळजपूर निके गाव, बिठूर हे ब्रह्मावर्त या सारख्या प्रवासवर्णननात तेथील निसर्ग आणि संस्कृती यांचा ते परिचय करून देतात त्यामुळे वाचकाला कुतूहल निर्माण होते. प्रा. रमेश तेंडुलकरांच्या

अभिप्रायाप्रमाणे 'एखाद्या व्यक्तीच्या सुखदु:खात रमण्यापेक्षा एखादे स्थळ, तेथील समाज, तेथील निसर्ग आणि संस्कृती यांनी माणसांच्या मनात भरलेले विविध रंग न्याहाळणाऱ्या जोशींची लेखणी अधिक समरस होते.[८]

'ब्रह्म्याची नगरी', श्रीमूळपीठ आणि हेन्री मूर, वैराज्यक्षेत्रमं उत्तमम, अळजपूर निके नगर ते ऋद्धिपूर देखिले,या आयोध्यापुरी देखितां लेखात धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक स्थलमहात्म्य ते वर्णन करतात.त्यातून वाचकांच्या मनात जिज्ञासा निर्माण करण्याचे सामर्थ्य लेखकाकडे आहे.या संदर्भात प्रा. रमेश तेंडूलकर लिहितात, अनेक ठिकाणांच्या इतिहासाची जोड त्यांच्या प्रवासविषयक लेखांत असल्यामुळे वर्तमानाबरोबर भूतकाळाची माहिती होते आणि वर्तमानाचा संदर्भ समजतो... चिंतनशीलतेची जोड या प्रवासवर्णनाला मिळालेली होती.[९]

मथुरा देवनिर्मिता, 'ब्रह्म्याची नगरी', श्रीमूळपीठ आणि हेन्री मूर, वैराज्यक्षेत्रमं उत्तमम, अळजपूर निके नगर ते ऋद्धिपूर देखिले,या आयोध्यापुरी देखितां, बिठूर हे ब्रह्मावर्त अशी जी स्थळे आहेत त्यांच्यात स्थलव्यक्तिमत्व निर्माण करण्याची ताकद रा. भि. जोशी यांच्या मध्ये आहे.

रा.भि. जोशी यांच्यावर संस्कृत, उर्दू व इंग्रजी तीन भाषांचे झालेले संस्कार, त्याचे हैद्राबादला गेलेले बालपण, विदर्भात झालेले शिक्षण, मुंबई,इंदोर या शहरांमध्ये झालेले उच्च शिक्षण यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व अनेक पदरी झाले आहे. शिवाय त्यांच्यातील जिज्ञासक वृत्ती इतिहास, भूगोल, इतिहास यांना कवेत घेते. त्यातून जे वर्णन ते करतात ते वाचकाला वाचण्यासाठी व स्थल दर्शनासाठी प्रवृत्त करतात. 'त्यांच्या स्थलवर्णनांत भारतातील अनेक स्थलांचे चित्रण आहे. अनुभवाकडे कविवृत्तीने पाहात, त्या त्या स्थळाशी निगडित असणारे सांस्कृतिक संदर्भ जागवीत ते त्या स्थलाचे अंतरंग जिवंत करतात. सूक्ष्म निरीक्षण, मार्मिक रसिकता यांमुळे ही प्रवासवर्णने वेधक ठरतात. हे त्यांच्या प्रवास वर्णनाचे सामर्थ्य आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


१. अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका (इ. स. १८००-१८७४),गंगाधर बाळकृष्ण सरदार, तिसरी आवृत्ति सन १९७१, मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पृष्ठ क्र.२०७
२. मराठी विश्वकोश, मराठी साहित्य- प्रवासवर्णने, चंद्रकांत वर्तक
३. मजल दरमजल, रा. भि. जोशी, मौज प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९६१, पृष्ठ.८
४. मजल दरमजल, रा. भि. जोशी, मौज प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९६१, पृष्ठ.१८
५. मजल दरमजल, रा. भि. जोशी, मौज प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९६१, पृष्ठ.२९
६. आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण, शिल्पकार चरित्रकोश खंड २, संपादक डॉ. सुभाष भेण्डे व इतर, प्रकाशक साप्ताहिक विवेक (हिंदुस्थान प्रकाशन संस्था),प्र.आ.२००९, पृष्ठ क्र. २२९
७. आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण, शिल्पकार चरित्रकोश खंड २, संपादक डॉ. सुभाष भेण्डे व इतर, प्रकाशक साप्ताहिक विवेक (हिंदुस्थान प्रकाशन संस्था),प्र.आ.२००९, पृष्ठ क्र. २३०

८. आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण, शिल्पकार चरित्रकोश खंड २, संपादक डॉ. सुभाष भेण्डे व इतर, प्रकाशक साप्ताहिक विवेक (हिंदुस्थान प्रकाशन संस्था),प्र.आ.२००९, पृष्ठ क्र. २३०
९. आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण, शिल्पकार चरित्रकोश खंड २, संपादक डॉ. सुभाष भेण्डे व इतर, प्रकाशक साप्ताहिक विवेक (हिंदुस्थान प्रकाशन संस्था) प्र.आ.२००९, पृष्ठ क्र. २३०
१०.संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश १९२० पासून २००३ पर्यंतचा कालखंड संपादक प्रभा गणोरकर जी. आर. भटकळ फाउण्डेशन, मुंबई पहिली आवृत्ती फेब्रुवारी २००४, पृष्ठ क्र.२९७